follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २५० * सातारा * गुरूवार * दि. २३ मे २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

# भाजपला २७२ चा आकडा गाठता आला नाहीतर...

## पाठिंब्याच्या चर्चांवर शरद पवारांचे मोठे वक्तव्य



**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या पाच टप्प्यांचे मतदान झाले आहे. दोनच टप्पे राहिले असून ४ जूनला निकाल लागणार आहे. मोदी सरकार येणार असल्याचे अनेक राजनितीकार सांगत आहेत, तर विरोधकांसह काही भाकीतकार मोदींना बहुमत मिळणार नाही असा दावा करत आहेत. महाराष्ट्रात महायुतीला रोखण्यात मविआला यश येत असल्याचे सांगितले जात आहे. अशातच जर मोदींना २७२ चा बहुमताचा आकडा गाठता आला नाही तर महाराष्ट्रातून मोठा गेम होण्याची देखील शक्यता राजकीय वर्तुळात वर्तविली जात आहे.

यावर शरद पवार २०१४ विधानसभेसारखा भाजपाला पाठिंबा देणार का, असाही सवाल विचारला जात आहे.

राष्ट्रवादी आणि भाजपाच्या नेत्यांनी शरद पवारांना खूप आधीपासून भाजपसोबत जायचे होते, असे दावे केले आहेत. तर उद्धव ठाकरेंनी देखील एकनाथ शिंदेंना नको मी सोबत येतो असेही भाजपाला म्हटल्याचे दावे करण्यात आले आहेत. अशातच जर संधी आली तर पवार-ठाकरे एनडीएच्या दिमतीला जातील आणि पदरात सत्तेसह मंत्रिपदेही पाडून घेऊ शकतात, असे दावे केले जात आहेत. यावर पवारांनी आपली भुमिका स्पष्ट केली आहे.

लोकसभा निवडणुकीत सत्तास्थापनेसाठी भाजपला जागा कमी पडल्या तरी त्यांच्यासोबत युती करणार नाही असे पवारांनी स्पष्ट केले आहे. तसेच उद्धव ठाकरे देखील भाजपासोबत जाणार नाहीत म्हणजे नाहीत, असे पवारांनी छातीठोकपणे सांगितले आहे. पत्रकार प्रशांत कदम यांनी शरद पवारांची मुलाखत घेतली. यामध्ये पवारांनी या गोष्टी स्पष्ट केल्या आहेत.

भाजपाने सुरुवातीचा ४०० चा आकडा नंतर ३९०, ३५० वर आणला. याचाच अर्थ हा ट्रेंड खाली येत होता, ते शब्द जपून वापरायला लागले होते. आता तर त्यांचे बहुमत देखील कमी होतेय असा ट्रेंड दिसू लागला आहे. परिस्थिती बदललेली नाही. राज्यात मविआच्या जागा वाढतील, मध्य प्रदेश, राजस्थानमध्येही काँग्रेसच्या जागा वाढणार आहेत. केजरीवालांच्या पक्षाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. यामुळे ४०० पार सोडा बहुमताचा आकडा ते कुठेपर्यंत गाठू शकतील हे सांगणे देखील कठीण झाले आहे, असे शरद पवार म्हणाले.

# पुणे अपघात प्रकरणातील अल्पवयीन आरोपीचा जामीन रद्द

## बालसुधारगृहात रहावे लागणार; बाल न्याय मंडळाचा मोठा निर्णय

**पुणे :** अपघात प्रकरणी अल्पवयीन आरोपीचा जामीन रद्द करण्यात आला असून त्याला आता बालसुधारगृहात राहावं लागणार आहे. दारू पिऊन नशेमध्ये भरधाव वेगाने गाडी चालवत या अल्पवयीन आरोपीने दोघांचा जीव घेतला होता. त्यानंतर त्याला जामीन मंजूर करण्यात आला होता. आता बाल न्याय मंडळाने त्याचा जामीन रद्द केला आहे. अल्पवयीन आरोपी हा सज्ञान आहे की नाही हे पोलिस ठरवतील असंही बाल न्याय मंडळाने म्हटलं आहे.

दारूच्या नशेत भरधाव गाडी चालवत दोघांचा जीव घेतल्यानंतर अवघ्या १५ तासांमध्येच त्या अल्पवयीन आरोपीला जामीन मिळाला होता. त्यामुळे नागरिकांतून एक प्रकारची नाराजी व्यक्त करण्यात येत होती. पोलिसांनी त्याच्यावर पुन्हा नवीन कलम लावलं आणि त्याचा जामीन रद्द करावा अशी मागणी केली होती. त्यानंतर आता बाल न्याय मंडळाने त्याचा जामीन रद्द केला.

बुधवारी सकाळी पुणे पोलिसांनी अल्पवयीन आरोपीला कोर्टात हजर केलं. त्यावेळी युक्तीवाद करत असताना पोलिसांनी मुलगा दारु प्यायला होता हे न्यायालयाला पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी अल्पवयीन मुलाने कोझी किचन हॉटेलमध्ये भरलेलं ४८ हजार रुपयांचे बीलही कोर्टासमोर सादर केलं. तर तिकडे बचावपक्षाच्या वकिलांनी मुलगा अल्पवयीन असल्याचा युक्तीवाद केला. दोन्ही बाजूचे युक्तीवाद झाल्यानंतर न्यायलायनं आदेश दिला.

हा मुलगा अल्पवयीन असल्याचं आरोपीच्या वतीने युक्तीवाद केला. तर या आरोपीने केलेलं कृत्य हे अत्यंत भीषण असं आहे, त्यामुळे त्यांच्यावर खटला चालवण्यासाठी परवानगी देण्यात यावी अशी मागणी पोलिसांच्या वतीनं करण्यात आली.

# निडणूका संपल्या, सरकारने आता दुष्काळाकडे लक्ष द्यावे: नाना पटोले

## आचारसंहिता शिथील करून सरकारने निर्णय घ्यावा



**मुंबई :** संपूर्ण राज्य दुष्काळाने होरपळत आहे. बहुतांश भाग भीषण टंचाईचा सामना करत आहे. अशा संकटात राज्य सापडले आहे. लोकसभा निवडणुका संपल्या असून आता राज्य सरकारने दुष्काळाकडे गांभिर्याने लक्ष दिले पाहिजे. धरणातील पाणीसाठा जेमतेम असून हजारो गावांना, वाड्या वस्त्यांना पिण्याचे पाणी मिळत नाही. पाणी टंचाई असलेल्या प्रत्येक गावखेड्यात पिण्याचे पाणी मिळावे तसेच जनावरांना चारा उपलब्ध झाला पाहिजे. यासाठी आचारसंहिता शिथिल करुन तातडीने पिण्याचे पाणी व जनावरांना चारा मिळेल यासाठी सरकारने निर्णय घ्यावेत, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, राज्याच्या ग्रामीण भागात हंडाभर पाण्यासाठी माता भगिनी भर उन्हात वणवण करत आहेत. जनावरांना चारा नाही.अनेक शहरात दहा बारा दिवसातून एकदा पाणी येते, राज्यातील २३ जिल्ह्यात पाण्याची भीषण टंचाई असल्याचे समजते, मराठवाड्यातील परिस्थिती तर अत्यंत गंभीर आहे. चारा नसल्याने दुध उत्पादक शेतकऱ्यासमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. राज्याला मोठ्या दुष्काळाचा सामना करावा लागत असून राज्य सरकारने उपाययोजना करण्यासाठी पावलं उचलावीत हे आम्ही चार महिन्यापूर्वी सांगितले होते पण राज्यातील भाजपा-शिंदे-अजित पवार यांचे सरकार आपसातील कुरघोड्या व दुसरे पक्ष फोडणे यातच व्यस्त असल्याने त्यांनी लक्ष दिले नाही. लोकसभा निवडणुकीमुळे शासन व प्रशासन निवडणुकीच्या कामात व्यस्त राहिले आता राज्यातील निवडणूक कार्यक्रम संपला आहे. राज्य सरकारने तातडीने पाणी व चाऱ्याची सोय करण्याकडे लक्ष दिले पाहिजे.

राज्यात ४५ दिवस पुरेल एवढा चारा उपलब्ध असल्याचे पशुसंवर्धन आणि दुग्धविकासमंत्री राधाकृष्ण विखे पाटील सांगत आहेत. चारा उपलब्ध असेल तर मग चारा छावण्या सुरु करण्यासाठी महाभ्रष्ट्युती सरकार कोणत्या मुहूर्ताची वाट पहात आहे ? राज्यात तातडीने चारा छावण्या सुरु केल्या पाहिजेत. अवकाळी पावसाच्या तडाख्याने आधीच शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे त्यात आता दुष्काळाचे संकट ओढवले आहे. शेतकरी चारी बाजूनी संकटाने घेरला आहे, त्याला आधार देण्याची गरज आहे सरकारने तातडीने उपयायोजना कराव्यात, असेही नाना पटोले म्हणाले.

# शिवसेना नेते गजानन किर्तीकर यांच्यावर पक्षांतर्गत कारवाई होणार ?



**मुंबई :** लोकसभा निवडणुकीत पक्षविरोधी वक्तव्य आणि संभ्रम निर्माण केल्याप्रकरणी गजानन किर्तीकर यांच्यावर पक्षांतर्गत कारवाईची शक्यता व्यक्त केली जात आहे. शिवसेना नेते शिशिर शिंदे यांनी आज शिवसेना पक्षाचे मुख्य नेते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्र लिहून किर्तीकर यांची पक्षातून हाकालपट्टी करण्याची मागणी केली आहे. दरम्यान किर्तीकर यांनी यावर भूमिका मांडत शेवेटपर्यंत शिंदेसोबत राहणार असल्याचे स्पष्ट केले. मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार रविंद्र वायकर जिंकले काय, हरले काय यात माझा काय दोष. मतदारांनी जे ठरवले आहे ते होईल. मात्र, येथे अमोल किर्तीकर जिंकला तर वडिल म्हणून नक्कीच आनंद होईल, अशा शब्दांत शिवसेनेचे ज्येष्ठ नेते गजानन किर्तीकर यांनी ठणकावले.

शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंची साथ सोडून एकनाथ शिंदेसोबत गेलो आणि कुटुंबात एकटा पडलो, असे विधान गजानन किर्तीकर यांनी केले होते. तसेच महाविकास आघाडीला लोकसभा निवड्णुकीत चांगल्या जागा मिळतील, असा दावा करत किर्तीकरांनी महायुतीत खळबळ उडवून दिली. या प्रकरणी ठाकरेंची बाजू घेणाऱ्या किर्तीकरांची हकालपट्टी करा, अशी मागणी शिवसेना उपनेते शिंदे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली. किर्तीकरांनी यावर परखड भूमिका मांडली.

वायकर यांची उमेदवारी निश्चित झाल्यापासून सोबत काम केले. पूर्वतयारी पासून आजवर जेवढ्या सभा झाल्या, तेथे हजर राहिलो. कोल्हापूर, नाशिक आदी ठिकाणच्या उमेदवारांचा प्रचार केला. तरीही काही गोष्टींचा विपर्यास केला गेला. याचा प्रचंड त्रास होतो आहे. कुणाच्याही जीवनात अशी वेळ येऊ नये, अशी खंत किर्तीकरांनी व्यक्त केली.

उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वात पक्ष भरकटल्याने एकनाथ शिंदेनी केलेल्या उठावाला साथ दिली. पक्षाला बळ देण्याचा प्रयत्न केला. तरीही शिशिर शिंदे यांनी हाकलपट्टीसाठी पत्र लिहिले. शिशिर ध्येयवादी आणि संवेदनशील शिवसैनिक आहे. त्याने भूमिका मांडली. मात्र शिंदेसोबत शेवटपर्यंत राहणार, असा दावा किर्तीकरांनी केला.

शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतर शिंदेसोबत जाऊ नये, अशी कुटुंबियांची भावना होती. परंतु, शिंदे भवितव्य घडवणारा नेता आहेत, असे किर्तीकर म्हणाले. दरम्यान मतदार संघात कोण जिंकेल, असा प्रश्न विचारला असता, वायकर हरला काय जिंकला काय यात माझा काय दोष, मतदारांनी जे ठरवले आहे, ते होईल. मात्र, अमोल जिंकल्यास वडील म्हणून निश्चित आनंद होईल, असे किर्तीकरांनी स्पष्ट केले.

# बौद्ध धम्म हेच लोकशाही विचारांचे उगमस्थान : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**मुंबई :** महाकारुणी तथागत भगवान गौतम बुध्दांनी अडीच हजार वर्षा पूर्वी भारतात सर्वप्रथम बहुजन हिताय बहुजन सुखाय हा जगाला लोकशाहीचा मुलमंत्र दिला.संपूर्ण जगाला लोकशाहीचा विचार बौध्द धम्मानेच दिला आहे. विश्वशांती,अहिंसा,समता,विश्वबंधुतत्व आणि वैज्ञानिक दृष्टीकोन बौध्दधम्मानेच जगाला दिले आहे.जगात अनेक ठिकाणी युध्दजन्य स्थिती आहे.

युध्दाच्या रक्तपाता पासुन जगाला वाचवण्यासाठि आजही जगाला भगवान बुध्दाच्या विचारांची गरज आहे.बौध्दधम्म सर्व मानवजातीसाठी आदर्श जीवन मार्ग आहे.असे सांगत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी २५८६ व्या बुध्द पौर्णिमे निमित्त सर्व भारतीयांना शुभेच्छा दिल्या आहेत.

उद्या दि.२३ मे रोजी बुध्द पौर्णिमे निमित्त सारनाथ येथील धम्मेक स्तुप येथे २५८६ व्या बुध्द पौर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन या बुध्द जयंती महोत्सवात ना.रामदास आठवले उपस्थीत राहणार आहेत. माणसांच्या मनात विचारांचे द्वंद्व सुरु असते.सर्व क्रिया आणि क्रांतीचे मन हेच केंद्र आहे.मनावर विजय मिळविला तर माणुस जगावर विजय मिळवू शकतो.

मनावर विजय मिळविण्यासाठी विपश्यनेचा मार्ग भगवान बुध्दांनी जगाला दिला आहे.भगवान बुध्दांचा विचार हा संपूर्ण मानव जातीचा उध्दार करणारा विचार आहे.बोधिसत्व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला बौध्दधम्माची दिक्षा दिल्याचा आम्हाला अभिमान आहे.असे ना. रामदास आठवले यांनी पाठवलेल्या शुभेच्छा संदेशात म्हटले आहे.

# निवडणूक यंत्रणेवर संशय घेणे हे उध्दव ठाकरे यांचे सततचे रडगाणे : उमेश पाटील



**मुंबई :** काम करणार्या प्रशासकीय यंत्रणेवर, निवडणूक यंत्रणेवर संशय घेणे हे उध्दव ठाकरे यांचे सततचे रडगाणे आहे असा थेट हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी माध्यमांशी बोलताना मंगळवारी केला.

एकीकडे आरोप करताना उध्दव ठाकरे त्याच निवडणूक प्रक्रियेतून सामोरे जात आहेत आणि दुसरीकडे छातीठोकपणे आमचे एवढे खासदार निवडून येणार मग आपला या यंत्रणेवर विश्वासच नाही तर कशाच्या आधारावर हा आत्मविश्वास आहे. ही यंत्रणा एकतर्फी काम करतेय तर मग तुम्हाला निवडून येण्याची खात्री कुठून आली आहे. महाविकास आघाडीच्या ३० - ३५ जागा येतील हे कशाच्या आधारावर बोलत आहात असे सवाल उमेश पाटील यांनी उध्दव ठाकरे यांना केले आहेत.

उध्दव ठाकरे यांचे हे दुटप्पी बोलणे असून सर्वच शहरात मतदानाची टक्केवारी कमी झाली आहे. ऊन्हाचा वाढलेला पारा आणि मतदारांचा निरुत्साह यामुळे मतदान कमी झाले. आता हे कमी का झाले यावर राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमलेली आहे याची नोंद घेतली पाहिजे असेही उमेश पाटील म्हणाले.

# उद्धव ठाकरेंवर निवडणूक आयोग कारवाई करणार?

## मतदानादिवशीची पत्रकार परिषद तपासण्याचं काम सुरू




**मुंबई :** लोकसभेच्या निवडणुकीच्या दिवशी उद्धव ठाकरे यांची झालेली पत्रकार परिषद आता राज्य निवडणूक आयोग तपासून पाहणार आहे. मुंबईत लोकसभा निवडणुकीसाठी मतदान सुरू असताना उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोगांला टार्गेट केल्याची भाजपा आमदार आशिष शेलार यांनी तक्रार केली होती. त्यावर आता निवडणूक आयोगाने कारवाई सुरू केली आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने या संदर्भात चौकशी करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. त्यामुळे आता राज्य निवडणूक आयोग या संदर्भात उद्धव ठाकरे यांची संपूर्ण पत्रकार परिषद तपासून पाहणार आहे. यात काही वादग्रस्त आढळल्यास निवडणूक आयोग यावर कारवाई करणार आहे.

मुंबईतील संथ मतदानावरून ठाकरेंची टीका

मुंबईतील सहा लोकसभा मतदारसंघांमध्ये २० मे रोजी मतदान पार पडलं. पण त्या दिवशी निवडणूक आयोगाच्या ढिसाळ व्यवस्थापनेमुळे मतदारांना चार-चार तास रांगेत राहावं लागलं. त्यामुळे अनेक मतदार हे मतदान न करताच घरी परतल्याचं दिसून आलं.

यावरून उद्धव ठाकरेंनी निवडणूक आयोगावर जोरदार टीका केली. तसेच हे भाजपचे कारस्थान असून ज्या ठिकाणी महाविकास आघाडीला मतं मिळण्याची शक्यता आहे त्या ठिकाणी जाणूनबूजून मतदानाला वेळ लावला जातोय असा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला होता.

मतदान सुरू असताना उद्धव ठाकरे कशी काय पत्रकार परिषद घेऊ शकतात असा सवाल करत मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार यांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार केली होती. उद्धव ठाकरेंनी आचारसंहितेचा भंग केल्याचा आरोप करत ठाकरेंनी पत्रकार परिषद घेत खोटी व दिशाभूल करणारी विधाने केली असंही ते म्हणाले. त्यामुळे निवडणूक आयोगाने त्यावर कारवाई करावी अशी मागणी आशिष शेलार यांनी केली.

काय म्हणाले होते उद्धव ठाकरे?

निवडणूक आयोग हा भाजपचा घरगडी असल्याप्रमाणे काम करत आहे. आयोगाकडून पक्षपातीपणा करण्यात येत असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला होता. पुढे बोलताना ते म्हणाले की, मतदान केंद्रावर जाणूनबूजून अधिकाऱ्यांकडून वेळकाढूपणा केला जातोय. मतदारांनी मतदानाला उतरवू नये, त्यांनी बाहेरच्या रांगा पाहून कंटाळून परत जावं यासाठी सरकारचा डाव आहे, असंही ठाकरेंनी म्हटलं होतं.

# नरेंद्र मोदी आणि एकनाथ शिंदेंच्या विकासकामांमुळेच यवतमाळमध्ये मतदानाचा टक्का वाढला : राजश्री पाटील



**हिंगोली :** कुणाचंही तिकीट कापल्यानंतर तो नाराज होणं हे स्वाभाविक आहे, पण भावना गवळी (इहरींरपर ऋुरश्रळ) यांनी मला लहान बहीण समजून मदत केली असं वक्तव्य शिवसेना शिदे गटाच्या यवतमाळ वाशिम लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार राजश्री पाटील (ठरक्षीहीळ झरींळश्र) यांनी केलं. जबाबदारी मोठी असल्याने मी प्रचार केला, पण आपलं काम कुणी केलं आणि कुणी नाही हे येत्या ४ जूनला समजेल असं सूचक वक्तव्यही त्यांनी केलं.

माझं इलेक्शन संपलं असलं तरी पक्षाने दिलेली वेगवेगळ्या मतदारसंघातील जबाबदारी पार पाडली, त्यामुळे माझं नेहमीच जे काम आहे ते सुरू केलं आहे असं राजश्री पाटील म्हणाल्या.

यवतमाळ वाशिम मतदारसंघ हा माझा माहेरचा मतदारसंघ आहे, माझ्या संस्थेच्या माध्यमातून सामाजिक कार्याच्या माध्यमातून प्रत्येक विधानसभा मतदारसंघांमध्ये माझं काम सुरूच होतं त्यामुळे एक वेगळी अटॅचमेंट या मतदारसंघामध्ये होती असं राजश्री पाटील म्हणाल्या.

मोदी-शिंदेंच्या कामामुळे मतदानाचा टक्का वाढला

मतदानाची टक्केवारी वाढली याचा फायदा हा महायुतीलाच होणार आहे असं सांगत राजश्री पाटील म्हणाल्या की, लेकीवर माहेरचं प्रेम असतं याकडे मी अतिशय सकारात्मकतेने बघते. जबाबदारी म्हणून यवतमाळ वाशिमच्या मतदारांनी जास्तीत जास्त संख्येने मतदान केलं असेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी, एकनाथ शिंदे यांनी केलेलं काम, या सर्व कामांचा परिपाक म्हणून मतदारसंघातील मतदानाचा टक्का वाढलेला आहे.

सहाही विधानसभेतील सर्व नेत्यांनी काम केलेलं आहे. सर्व पक्षातील सर्व नेते, कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी माझं काम केलं आहे. स्वतःचं काम म्हणून त्यांनी सर्वांनी माझं काम केलं आहे. सर्व समाजातील लोकांनी मला भरभरून मतदान केलेलं आहे असं राजश्री पाटील म्हणाल्या.

भावना गवळी नाराज होणं स्वाभाविक

हिंगोलीत हेमंत पाटलांची उमेदवारी नाकारून मला यवतमाळमध्ये पाठवण्यात आलं. कुणाचीही उमेदवारी गेल्यानंतर नाराज होणे हे अत्यंत साहजिक आहे असं राजश्री पाटील म्हणाल्या. त्या म्हणाल्या की, माणुसकीच्या भावनेतून आपण ते समजून घेतलं पाहिजे. परंतु भावना गवळी यांनी एक लहान बहीण म्हणून मला मदत केली आहे. या ठिकाणी मुख्यमंत्र्यांची रॅली झाली आहे. माझ्या एक-दोन सभांमध्ये भावना गवळी माझ्यासोबत होत्या. एवढा मोठा मतदारसंघ असल्याने मी सगळीकडे फिरत होते, मला जी जबाबदारी दिली होती, प्रचाराचा कार्यक्रम आखलेला होता

## संपादकीय

# मान्सूनची प्रतीक्षा

उन्हाळ्याचे दिवस आता आणखी किती परीक्षा पाहणार असाच एक प्रश्न अनेकांच्या मनात घर करत आहे. निमित्त ठरतंय ते म्हणजे दर दिवशी सातत्यानं होणारी तापमानवाढ. सध्या भारतातील बहुतांश राज्यांमध्ये उन्हाळा अडचणी वाढवताना दिसत आहे. वाढत्या उकाड्यामुळं काही भागांमध्ये अवकाळीचं संकट तर, कुठं ढगाळ वातावरणही पाहायला मिळत आहे. वातावरणाची ही एकंदर स्थिती पाहता आता मान्सून कधी येणार हाच प्रश्न सर्वांच्या मनात घर करत आहे.

शेतकऱ्यांच्या दृष्टीने मान्सूनला विशेष महत्त्व असते. साधारण जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात मान्सून महाराष्ट्रात दाखल होतो. असे असले तरी त्याच्या कितीतरी दिवस आगोदर तो भारतात प्रवेश करतो. मान्सून भारतात दाखल होण्याचे ठिकाण हे केरळ असते. केरळमधूनच मान्सून भारतात दाखल होतो आणि परतही जातो.

यंदा जून ते सप्टेंबर या महिन्यांमध्ये भारतात मान्सूनचा पाऊस होईल. हे प्रमाण सरासरी १०२ टक्के इतकं असेल. शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत यंदाच्या वर्षी मान्सून २०२३ प्रमाणं अनियमित नसून, तो बहुतांशी अंदाज वर्तवल्याप्रमाणं हजेरी लावेल असा अंदाज वर्तवला. या अंदाजनुसार देशात जून ते सप्टेंबर या काळात ८६८.६ मिमी पावसाची शक्यता आहे. जून महिन्यात पावसाची सरासरी ९५ टक्के हजेरी असेल. तर, जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये सरासरी अनुक्रमे १०५, ९८ आणि ११० टक्के पाऊस पडेल.

यंदाच्या वर्षी देशाच्या दक्षिण पश्चिम आणि उत्तर पश्चिम भागामध्ये समधानकारक पावसाटी शक्यता वर्तवली आहे. तर, देशाच्या पश्चिम आणि मध्य भागामध्ये सामान्यहून अधिक पावसाची शक्यता आहे. पूर्वोत्तर भारत आणि देशाच्या पूर्वेकडे असणाऱ्या राज्यांना मात्र हा पाऊस चकवा देणार असून, इथं पाऊस सामान्यहून कमी असेल असा अंदाज स्कायमेटनं वर्तवला आहे.

महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या मान्सूनच्या अधिक प्रभावाअंतर्गत येणाऱ्या भागांमध्ये यंदा समाधानकारक-सामान्य स्वरुपातील पावसाची शक्यता आहे. तर, झारखंड, बिहार, ओडिशा आणि बंगाल यांसारख्या पूर्वेकडील राज्यांमध्ये सरासरीहून कमी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यंदाच्या वर्षी कर्नाटक, केरळ, गोवा आणि कोकणात सामान्यहून अधिक पावसाची शक्यता वर्तवण्यात आल्यामुळं कोकणकरही सुखावले आहेत.

मान्सूनचा अंदाज दिलासा देणारा असला तरीही अल निनोचं रुपांतर ला निमामध्ये होत असल्यामुळं मान्सूनच्या आगमनास काहीशी दिरंगाई होऊ शके. याशिवाय कमी कालावधीत जास्त पावसासह विविध भागांमध्ये पावसाचं कमीजास्त प्रमाण अशी तफावत या काळात पाहायला मिळू शकते.

शेतकऱ्यांच्या दृष्टीने मान्सूनला विशेष महत्त्व असते. साधारण जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात मान्सून महाराष्ट्रात दाखल होतो. असे असले तरी त्याच्या कितीतरी दिवस आगोदर तो भारतात प्रवेश करतो. मान्सून भारतात दाखल होण्याचे ठिकाण हे केरळ असते. केरळमधूनच मान्सून भारतात दाखल होतो आणि परतही जातो.

यंदा जून ते सप्टेंबर या महिन्यांमध्ये भारतात मान्सूनचा पाऊस होईल. हे प्रमाण सरासरी १०२ टक्के इतकं असेल. शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत यंदाच्या वर्षी मान्सून २०२३ प्रमाणं अनियमित नसून, तो बहुतांशी अंदाज वर्तवल्याप्रमाणं हजेरी लावेल असा अंदाज वर्तवला. या अंदाजनुसार देशात जून ते सप्टेंबर या काळात ८६८.६ मिमी पावसाची शक्यता आहे. जून महिन्यात पावसाची सरासरी ९५ टक्के हजेरी असेल. तर, जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये सरासरी अनुक्रमे १०५, ९८ आणि ११० टक्के पाऊस पडेल.

यंदाच्या वर्षी देशाच्या दक्षिण पश्चिम आणि उत्तर पश्चिम भागामध्ये समधानकारक पावसाटी शक्यता वर्तवली आहे. तर, देशाच्या पश्चिम आणि मध्य भागामध्ये सामान्यहून अधिक पावसाची शक्यता आहे. पूर्वोत्तर भारत आणि देशाच्या पूर्वेकडे असणाऱ्या राज्यांना मात्र हा पाऊस चकवा देणार असून, इथं पाऊस सामान्यहून कमी असेल असा अंदाज स्कायमेटनं वर्तवला आहे.

महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या मान्सूनच्या अधिक प्रभावाअंतर्गत येणाऱ्या भागांमध्ये यंदा समाधानकारक-सामान्य स्वरुपातील पावसाची शक्यता आहे. तर, झारखंड, बिहार, ओडिशा आणि बंगाल यांसारख्या पूर्वेकडील राज्यांमध्ये सरासरीहून कमी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यंदाच्या वर्षी कर्नाटक, केरळ, गोवा आणि कोकणात सामान्यहून अधिक पावसाची शक्यता वर्तवण्यात आल्यामुळं कोकणकरही सुखावले आहेत.

मान्सूनचा अंदाज दिलासा देणारा असला तरीही अल निनोचं रुपांतर ला निमामध्ये होत असल्यामुळं मान्सूनच्या आगमनास काहीशी दिरंगाई होऊ शके. याशिवाय कमी कालावधीत जास्त पावसासह विविध भागांमध्ये पावसाचं कमीजास्त प्रमाण अशी तफावत या काळात पाहायला मिळू शकते.

# उजनी दुर्घटना शोधमोहिमेत कट्टर विरोधकांची आपुलकी

**सोलापूर** : महाराष्ट्राची एक संस्कृती आहे, महाराष्ट्राची राजकीय परंपरा आहे, महाराष्ट्र इतर राज्यांपेक्षा वेगळा आहे, असं आपण नेहमीच ऐकतो. मात्र, गेल्या काही वर्षातील राजकारण पाहता महाराष्ट्राती राजकीय संस्कृती लयाला गेली आहे, राजकारणाचा चिखल झालाय, अशा संतप्त प्रतिक्रियाही उमटतात. मात्र, काही क्षण असे असतात जे पुन्हा एकदा महाराष्ट्राची संस्कृती आणि भानविकतेचं दर्शन घडवतात. उजनी जलाशयात (णक्षरपळ) ६ जण बुडाल्याची दुर्घटना मंगळवारी सायंकाळी घडली. या घटनेनंतर प्रशासन खडबडून जागे झालं आहे. तर, इंदापूर व करमाळा परिसराशी संबंधित ही घटना असल्याने या क्षेत्रातील दोन्ही खासदार (ाशालशी ेष रीश्रळाशपीं) आज सकाळीच घटनास्थळी पोहोचले. उजनी धरणात बोट बुडाल्ची माहिती मिळताच स्थानिक आमदार दत्तात्रय भरणे यांनी रात्रीच घटनास्थळी धाव घेतली होती. त्यानंतर, आज

## खा. निंबाळकरांसाठी पुढे सरसावल्या सुप्रियाताई



सकाळपासून इतर राजकीय नेत्यांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थितीचा आढावा घेतला.

अपघातस्थळाची जागा अतिसय अरुंद व आतमध्ये दूरपर्यंत असल्याने चिखलवाटेतून मार्ग काढत घटनास्थळापर्यंत पोहोचणे दिव्यच होते. तरी देखील बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे सकाळीच घटनास्थळावर दाखल झाल्या होत्या. तर, कळाशी येथे भेट देण्यासाठी माढा लोकसभेचे खासदार रणजीतसिंह निंबाळकर हे देखील निघाले होते. खासदार निंबाळकर यांनीही लाईफ सेव्हींग जॅकेट परिधान करुन बोटीने शोधमोहिमेत सहभाग घेतला होता. तत्पूर्वी घटनास्थळावर पोहोचण्यासाठी कसे जावे याची माहिती घेत पुढे जात असतानाच समोरच त्यांना खासदार सुप्रिया सुळे दिसल्या. त्यावेळी, सुप्रिया सुळे यांनीच खासदार निंबाळकर यांना संबंधित घटनेची इतंभू माहिती दिली. नेमकी घटना कशी घडली, इथपासून ते घटनास्थळावर कसे पोहोचायचे हेही सांगितले. एवढ्यावर न थांबता त्यांनी आपल्या सोबतच्या एका सहकाऱ्यास खा. निंबाळकर यांच्यासमवेत रस्ता दाखवण्यासाठी पाठवले होते. गेल्या महिनाभरात एकमेकांच्या विरोधात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी करणारे हे राजकीय विरोधक

### निवडणुकांत ऐकमेकांवर टीका

**भाजप नेते आणि माढ्याचे खासदार रणजितसिंह निंबाळकर हे नेहमीच बारामतीवर सडकून टीका करताना दिसतात. राजकारणात सुरुवातीपासून त्यांनी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार आणि अजित पवार यांना लक्ष्य केल्याचं पाहायला मिळालं आहे. मात्र, अजित पवार महायुतीत आल्यावर निंबाळकर यांच्या टीकेच्या धनी खासदार सुप्रिया सुळे ह्याच राहिल्या आहेत. तर, सुप्रिया सुळेंनी देखील रणजितसिंह निंबाळकर यांच्यावर निवडणूक काळात जोरदार टीका केल्याचं दिसून आलं. मात्र, अनावधानाने आज हे दोन्ही नेते समोरासमोर आले. त्यावेळी, या दोन्ही कट्टर विरोधी राजकारण्यांचे वैयक्तिक नातं हे किती दृढ आहे, याची प्रचिति उपस्थितांना आली.**

आज संवेदनशीलता जपत एकत्र आल्याचे पाहून ग्रामस्थांनाही बरे वाटले.

**दु:खत प्रसंगात जपली संवेदनशीलता**

खासदार निंबाळकर यांना उजनी जलाशयातील अवघड रस्ता समजून ते लवकर घटनास्थळी पोहोचावेत, यासाठी सुळे यांनी मदत केली. यावेळी, दोघांमध्ये संबंधित घटनेवर प्रदीर्घ चर्चाही झाली. सुप्रिया सुळेंनी वाटेतील गाड्या बाजूला काढून त्यांना रस्ता द्यायला लावला, याशिवाय त्यांच्यासोबत आपला एक माणूस देऊन निंबाळकर याना घटनास्थळी पोहोचले. संवेदनशील घटनांमधून राजकीय नेत्यांचे असे वेगळे नातेही, या दु:खद प्रसंगातून जनतेसमोर आले. दरम्यान, सुप्रिया सुळेंनी केलेल्या मदतीसाठी खासदार निंबाळकर यांनीही हात जोडून त्यांचे आभार मानत मानले. राजकारणाचा चिखल झाल्याची टीका नेहमीच होत असते. मात्र, जनसेवेत आणि दु:खद प्रसंगात व्यक्तिगत हेवेदावे विसरुन झालेला हा एकोपा अनेकांच्या काळजात घर करुन गेला.

# दौंड तालुक्यात दहा शाळांचा निकाल शंभर टक्के

**दौंड** -- दौंड तालुक्यात इयत्ता बारावीच्या परीक्षेत दहा शाळांचा निकाल शंभर टक्के लागला असून तालुक्यातील बहुतांशी शाळेत प्रथम तीन क्रमांकामध्ये मुलींनी बाजी मारली आहे दरम्यान शाळेला मिळालेली एकूण टक्केवारी आणि विभागनिहाय टक्केवारी पुढीलप्रमाणे रंभाबाई कटारिया विद्यालय बोरीबेल, ( १००), सायन्स (१००), मेरी मेमोरियल हायस्कूल दौंड, ( १००) सायन्स (१००), श्री मंगेश मेमोरियल स्कूल दौंड (१००) सायन्स (१००), अंबिका पब्लिक स्कूल ( १००), सायन्स (१००),ज्युनिअर कॉलेज ,नानगाव ( १०० टक्के), कॉमर्स विभाग (१०० ). दत्तकला हायस्कूल स्वामी चिंचोली (१००) सायन्स (१००), कॉमर्स (१००), खंबेश्वर हायस्कूल खामगाव ( १००), सायन्स (१००), आर्ट्स (१००), संत सेबेस्टियन हायस्कूल दौंड, (१००) सायन्स (१००), कॉमर्स (१००), भरीगत इंग्लिश स्कूल खडकी ( १००), सायन्स (१००), दौंड महाविद्यालय (१००) तांत्रिक विभाग (१००) शेठ ज्योती प्रसाद विद्यालय दौंड ( ९१.३९ ) ( सायन्स विभाग ( ९४.४६ ), आर्ट्स (७२.९), कॉमर्स (८४.८७ ), दौंड तालुका आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज (८६.२७ ) , आर्ट्स ( ८२.१४), कॉमर्स ( ९१.३०), कैलास विद्या मंदिर राहू, ( ८७.५५), सायन्स (१००), आर्ट्स ( ७५.२३), कॉमर्स ( १००), गोपीनाथ विद्यालय ,वरवंड (९९.५१), सायन्स ( ९९.४८), आर्ट्स ( ९९.५७), कॉमर्स ( १००) जवाहरलाल विद्यालय केडगाव ( ९०.६१ ), सायन्स ( ९७.२१), आर्ट्स ( ७०.०२), कॉमर्स (९४.५९), विद्या विकास मंदिर यवत ( ८४.७४) आर्ट्स (७३.३३), कॉमर्स ( ९६.५५), नागेश्वर विद्यालय पाटस ( ८८.४६) आर्ट्स ( ८८.४६), श्री सिद्धेश्वर विद्यालय देऊळगाव राजे, (८० ) आर्ट्स (८०) न्यू इंग्लिश स्कूल पारगाव ( ९३.३३) , सायन्स ( १००), आर्ट्स ( ८२.३५), कॉमर्स (१००) भैरवनाथ विद्यालय खुटबाव, ( (९१.५८) सायन्स ( ९७.०७) आर्ट्स ( ७६), कॉमर्स ( ८६.३६) श्री विठाबाई चव्हाण कन्या विद्यालय दौंड ( ७७.४१) आर्ट्स (७७.४१), एम. व्ही भागवत विद्यालय पाटस ( ८८.७०) , सायन्स ( १००), आर्ट्स (८२.९३), लाजवंती गॅरैला हायस्कूल दौंड ( ९०.१४) सायन्स (१००), आर्ट्स (७६.६६), गुरुदेव दादोजी कोंडदेव हायस्कूल मलठण ( ७८.९४) आर्ट्स (७८.९४), आदर्श विद्यालय कानगाव ( ९६.३९), सायन्स ( १००), आर्ट्स ( ९७.५०), मज श्री फिरंगाई माता हायस्कूल कुरकुंभ ( ९८.९६) , सायन्स (१००), आर्ट्स ( ९४.४४), कॉमर्स (१००). राजेभोसले विद्यालय खानवटे ( ९२.३०), आर्ट्स (९२.३०) श्री एन .टी .पवार विद्यालय सोनवडी ( ९२), सायन्स (९३.७५),

## कोंढवा येथे बुद्ध जयंती उत्सव

**पुणे:** इनक्रेडीबल समाजसेवक ग्रुप तर्फे बुधवार ,दि.२३ मे रोजी बुद्ध जयंती उत्सव साजरा करण्यात येणार आहे.बुद्ध पौर्णिमा ही तथागत गौतम बुद्ध यांची जयंती आहे.सर्वधर्मसमभाव जपण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सर्व जण एकत्रितपणे साजरा करणार आहेत.

इनक्रेडीबल समाजसेवक ग्रुपचे संस्थापक असलम इसाक बागवान यांनी ही माहिती दिली. भैरवनाथ मंदिर समोर (लोणकर स्मशानभूमी द्वार) कोंढवा येथे 'एक गाव, एक उत्सव' या धारणेने दुपारी १ वाजता हा कार्यक्रम करण्यात येणार आहे.

## आमदार पी. एन. पाटील यांचे निधन



**कोल्हापूर** : कोल्हापूरजिल्ह्याती लकाँग्रेसचाढाण्या वाघ अशी प्रतिमा असलेले,काँग्रेसशीअतूट निष्ठा ठेवून आयुष्यभर वाटचाल केलेले आणि सामान्य कार्यकर्त्याचा आधारवड बनलेले नेते आमदार पांडुरंग निवृत्ती उर्फ पी. एन. पाटील (वय ७१ रा. मुळ गांव सडोली खालसा, ता.करवीर सध्या राहणार राजारामपुरी कोल्हापूर) यांचे आज सकाळी सहा वाजता मेंदूत रक्तस्राव होवून आकस्मिक निधन झाले. त्यांच्या अशा अचानक जाण्याने त्यांच्यावर जीवापाड प्रेम करणाऱ्या लाखो कार्यकर्त्यांवर दू:खाचा डोंगरच कोसळला. कमालीचे पोरकेपण साऱ्यांनीच अचानकपणे अनुभवले. अनेक कार्यकर्ते ओक्साबोक्सी रडत होते. कुणी कुणाला सावरायचे अशी स्थिती निर्माण झाली. त्यांच्या पश्चात मुलगा राजेश, राहूल, विवाहित मुलगी टीना, बहिण दमयंती मोहिते यांच्यासह मोठा परिवार आहे.

जिल्ह्यातील काँग्रेसच्या राजकारणाचाही ते कणा होते.आमदारपाटील हे प्रकृतीच्या बाबतीतकमालीचे दक्ष होते. परंतू लोकसभा निवडणूकीत तब्बल महिनाभर त्यांनी प्रचारासाठी रात्रीचा दिवस केला. त्यामुळे मतदान झाल्यानंतर त्यांना त्रास जाणवू लागला. म्हणून आवश्यक सर्व तपासण्या करूनही घेतल्या. त्यामध्ये कांहीच दोष न आढळल्याने ते थोडे निवांत झाले. तसेही शनिवारीच घरी जावून शाहू छत्रपती यांनी त्यांना तुम्ही आजारपण अंगावर काढू नका, तातडीने रुग्णालयात दाखल व्हा असा आग्रह धरला होता. परंतू आता बरे वाटते आज/ उद्या जातो दवाखान्यात असे त्यांचे मत पडले. नियतीने तेवढाच डाव साधला आणि रविवारी सकाळी ब्रश करताना ते कोसळले. तेथूनच त्यांचा परतीचा प्रवास सुरु झाला.

# नारायणगावचे गुरुवर्य सबनीस विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय उत्तर पुणे जिल्ह्यात अव्वल

**नारायणगाव** :- इयत्ता १२ वी चा आज २१ मे रोजी निकाल जाहीर झाला. यामध्ये ग्रामोन्नती मंडळाचे गुरुवर्य रा.प. सबनीस विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, नारायणगाव हे उत्तर पुणे जिल्ह्यात अव्वल ठरले आहे. यावर्षीही महाविद्यालयाच्या उज्ज्वल परंपरेला साजेसा निकाल लागला असून कला, वाणिज्य, विज्ञान व व्यावसायिक शाखांतील विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यशावर आपले नाव कोरले आहे. कनिष्ठ महाविद्यालयाचे बोर्ड परीक्षेत एकूण ८८३ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते यापैकी ८४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. कनिष्ठ महाविद्यालयाचा शेकडा निकाल ९५.५८ टक्के लागला.

विज्ञान शाखा ९९.१४%, वाणिज्य शाखा ९६.७६%, कला शाखा ७६.८५%, व व्यावसायिक विभाग ८४.४४ % निकाल



लागला.

विज्ञान विभागामध्ये प्रथम क्रमांक कु. वर्पे ज्ञानेश्वरी योगेश ९२.०० %, द्वितीय क्रमांक यहळे प्रणव काळूराम ८९.६७ %, तृतीय क्रमांक कु. बटवाल सानिका शामराव ८९.००%, वाणिज्य विभागामध्ये प्रथम क्रमांक चव्हाण प्रज्वल संदीप ९३.८३%, द्वितीय क्रमांक कु. मुथ्था पलक निर्मल ९३.३३%, तृतीय क्रमांक भुजबळ श्रेयस भागेश्वर ९१.३३%, कला विभागामध्ये कु. क्षीरसागर मोनिका सूर्यकांत ७८.५०%, द्वितीय क्रमांक दुधाणे सुजित शेखर ७८.३३%, तृतीय क्रमांक काळे तन्मय रामदास ७५.३३ % तसेच व्यावसायिक विभागामध्ये कु. डिसोजा रोजी जॉन ६९.३३% द्वितीय क्रमांक पाबळे गिरीश नितीन ६८.८३%, तृतीय क्रमांक कु. गायकवाड दीपाली कैलास ६७.५०% मिळवला.

या निकालाची उल्लेखनीय बाब म्हणजे विज्ञान शाखेत ४३ विद्यार्थी विशेष प्राविण्याने व १७५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. तसेच कु. बटवाल सानिका शामराव, कु. डोंगरे पायल दीपक या विद्यार्थिनींनी माहिती तंत्रज्ञान विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले व ढोले आर्यन अमोल या विद्यार्थ्यांने कृषी विज्ञान व तंत्रज्ञान या विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले. त्याचबरोबर बुक कीपिंग अँड अकाउंटन्सी, कृषी विज्ञान व तंत्रज्ञान त्याचबरोबर माहिती तंत्रज्ञान या विषयांत ८ विद्यार्थ्यांनी १०० पैकी ९९ गुण मिळवले.

सर्व यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचे ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिलतात्या मेहेर, अध्यक्ष प्रकाशमामा पाटे, कार्यवाह रविंद्र पारगावकर, सर्व संचालक मंडळ, विद्यामंदिराचे मुख्याध्यापक सतीशसिंह तंवर, उपप्राचार्य हनुमंत काळे, पर्यवेक्षक संजय वलटे यांनी अभिनंदन केले.

# बुद्ध पौर्णिमा

बुद्ध जयंती किंवा बुद्ध पौर्णिमा हा बौद्ध धर्मीयांचा सर्वात महत्त्वाचा सण व उत्सव आहे.१ हा सण जगभरात विशेषतः भारतात वैशाख पोर्णिमेच्या दिवशी साजरा केला जातो.२ या दिवशी तथागत गौतम बुद्धांचा जन्म, ज्ञानप्राप्ती व महापरिनिर्वाण या तीनही घटना झाल्या आहेत

बुद्ध पौर्णिमेला बोधगया येथे जगभरातून बौद्ध अनुयायी येतात आणि प्रार्थना करतात.८ बिहारमधील बोधगया हे बौद्ध धर्मानुयायांचे पवित्र तीर्थक्षेत्र आहे. गृहत्यागानंतर सिद्धार्थांनी सत्याच्या शोधासाठी सात वर्ष कठोर तपश्चर्या व साधना केली आणि त्यांना त्यानंतर त्यांना बोधगया येथील एका-बोधिवृक्षाखाली बुद्धत्व किंवा ज्ञानप्राप्ती झाली. ही घटना वैशाख पौर्णिमेला झाली. तेव्हापासून हा दिवस बुद्ध पौर्णिमा म्हणून ओळखला जातो.३ बुद्ध पौर्णिमेच्या वेळी कुशीनगर येथे महापरिनिर्वाण विहार या ठिकाणी एक महिना तथागत गौतम बुद्धांचे स्मरण केले जाते. हे ठिकाण गौतम बुद्ध यांच्याशी संबधित असले तरी बौद्धांसह आजूबाजूच्या परिसरातील अन्य लोक देखील या ठिकाणाला मोठ्या संख्येने भेट देतात व येथील बुद्ध विहारात आस्थापूर्वक पूजा करतात. या विहाराचे महत्त्व गौतम बुद्धांच्या महापरिनिर्वाणा शी जोडले गेले आहे. या विहाराचे स्थापत्य अजिंठा लेण्यांच्या विहारासारखे आहे. या विहारात गौतम बुद्धांची



अंतिम क्षणाच्या मृत्युशय्येवर पडलेल्या अवस्थेतील (भू-स्पर्श मुद्रा) ६.१ मीटर लांबीची मूर्ती आहे. ही मूर्ती लाल मातीपासून बनवलेली आहे. जेथून मूर्तीसाठी माती काढली आहे तेथेच हा विहार तयार केला आहे.९ विहाराच्या पूर्व भागात एक स्तूप आहे. तेथे गौतम बुद्धांवर अंतिम संस्कार झाले.

बुद्ध जयंतीच्या दिवशी बौद्ध अनुयायी घरांमध्ये दिवे लावतात. घरे फुलांनी सजवतात. बौद्ध परंपरेतील धार्मिक ग्रंथांचे वाचन, पठण केले जाते. विहारातील तसेच घरातील बुद्धांच्या मूर्तीची फुले वाहून, दिवे ओवाळून पूजा केली जाते. बोधिवृक्षाचीही पूजा केली जाते आणि त्याच्या फांद्यांना पताकांनी सुशोभित केले जाते. वृक्षाच्या आसपास दिवे लावले जातात. झाडाच्या मुळाशी दूध आणि सुगंधी पाणी घातले जाते. या दिवशी केलेल्या चांगल्या कामांमुळे पुण्य मिळते अशी समजूत आहे

जगातील दु:ख नाहीसे करण्यासाठी भगवान गौतम बुद्धांनी निरनिराळे मार्ग अनुसरले. यासाठी स्वतःचे घरदार सोडून ध्यान मार्ग आणि तपश्चर्येचा मार्गही अनुभवला. मात्र, वैशाख शुद्ध पौर्णिमेला त्यांना ज्ञान प्राप्त झाले आणि दु:खाचे मूळ व ते नाहीसे करण्याचा मार्ग सापडला. ही पौर्णिमा बुद्ध पौर्णिमा म्हणून साजरी केली जाते.

आरंभीच्या प्रथमावस्थेतील बौद्ध धर्म हा अगदी साधा, समजण्यास सोपा, नैतिक तत्त्वांवर भिस्त ठेवणारा व मानवता, करुणा व समानता यांचा पुरस्कार करणारा असा होता. या काळात बुद्ध हा असामान्य गुणवत्ता असलेला, पण मानवदेह धारण करणाराच मानला जात होता. त्यांना बोधिवृक्षाखाली संबोधी (ज्ञान) प्राप्त झाले म्हणजे त्यांना या जगात कोणती अबाधित सत्ये आहेत व जगाचे रहाटगाडगे कसे चालते, या सबंधीचे ज्ञान प्राप्त झाले. त्यांना प्रथम चार आर्य सत्यांचा साक्षात्कार झाला. जगात खोल दृष्टीने विचार करता व सर्वत्र चालू असलेले भांडण-तंटे, झगडे, हाणामारी हे दृश्य पाहून सर्वत्र दु:ख पसरलेले आहे. या पहिल्या आर्य सत्याची जाणीव झाली.१४ दु:ख कशामुळे उत्पन्न होते, यासबंधी विचार करता त्यांना आढळून आले की, हे सर्व लोभामुळे, तृष्णेमुळे उत्पन्न होते. एकाच वस्तूबद्दल दोन व्यक्तींच्या मनात तृष्णा उत्पन्न झाली म्हणजे ती वस्तू स्वतःला मिळविण्याकरिता भांडण-तंटे, झगडा, हाणामारी आलीच. तेव्हा तृष्णा हे दु:खाचे मूळ आहे, असे दुसरे आर्य सत्य त्यांना उमजले. ज्या ज्या गोष्टीला एखादे कारण आहे ती ती गोष्ट, कारण नाहीसे केले म्हणजे, नष्ट होते. हे अबाधित तत्त्व आहे. म्हणून त्या दु:खाचा निरोधही होऊ शकतो, हे तिसरे आर्य सत्य त्यांना समजले. निरोध होऊ शकतो तर तो प्राप्त करून घेण्याचा मार्ग असलाच पाहिजे, हे चौथे आर्य सत्यही त्यांना कळून आले.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# विदर्भात अवकाळी पावसाचा धूमाकूळ सुरुच

## तर पुढील चार दिवस 'या' जिल्ह्यात उष्णतेची लाट



**यवतमाळ :** राज्यातील वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. कुठं उन्हाचा तडाखा सुरु आहे, तर कुठं अवकाळी पावसाचा कहर आहे. दरम्यान, नागपूर प्रादेशिक हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार विदर्भात पुन्हा एकदा अवकाळी पावसाने दमदार हजेरी लावली आहे. विदर्भातील बहुतांश ठिकाणी काल दुपारच्या सुमारास झालेल्या अवकाळी पावसाने अक्षरक्ष: धुमाकूळ घालत अनेकांचे मोठे नुकसान केले आहे.

तर या अवकाळीचा सर्वाधिक फटका हा शेतकऱ्यांना बसला आहे. आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांचा हाता-तोंडाशी आलेला घास पुन्हा एकदा अवकाळी पावसाने हिरावून घेतलाय. अवकाळी पावसाचे सावट कायम असताना विदर्भात पुढील काही दिवस अवकाळी ढग कायम असून आता उष्णतेच्या लाटेचा इशाराही हवामान विभागाकडून (खचऊ) देण्यात आलाय.

**पुढील चार दिवस 'उष्णतेची लाट**

गेल्या काही दिवसांपासून राज्यासह देशात एक वेगळ्याच प्रकारचे वातावरण बघायला मिळत आहे. एकीकडे उष्णतेचा पारा तपात असताना दुसरीकडे अवकाळी पावसाने अक्षरक्ष: धुमाकूळ घातला आहे. अशातच विदर्भात अवकाळी पावसाने गेल्या अनेक दिवसापासून तळ ठोकला असताना आता उष्णतेची लाटेचा इशारा नागपूर प्रादेशिक हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. विदर्भातील अकोला येथे दिनांक २३ मे ते २६ मे दरम्यान पुढील चार दिवस उष्णतेची लाट असणार आहे. तसेच उद्या २३ मे पासून पूढील ४८ तास विदर्भातील बुलढाणा, यवतमाळ, वाशिम, अकोला आणि अमरावती येथे विजांच्या कडकडाटासह वादळ, ३०-४० किमी प्रतितास सोसाट्याचा वाऱ्यासह या जिल्ह्यांना यलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. परिणामी, संभाव्य धोका लक्षात घेता योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहनही हवामान विभागाकडून करण्यात आले आहे.

**केळी पिकांचेही प्रचंड नुकसान**

यवतमाळच्या महागाव तालुक्यातील गुंज माळकिनी या शेत शिवारात मंगळवरच्या रात्री झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्याने केळी बागेचे मोठे नुकसान केले आहे. यात केळी पीक हे परिपक्व होण्याच्या अवस्थेत असताना वादळी वाऱ्यामुळे बागा भुईसपाट झाल्या आहेत.

त्यामुळे शेतकऱ्यांचे लाखोंचं नुकसान झाले आहे. या शेतकऱ्यांचे गत दोन महिन्यांमध्ये विविध पिकांच्या नुकसानीची ही पाचवी वेळ असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहे.

शेतमालाच्या नुकसानीचे तातडीने कृषी विभाग व महसूल विभागाने पंचनामे करून आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी अमोल मदने, पांडुरंग चव्हाण, प्रकाश चव्हाण, गजानन काळकर, ज्ञानेश्वर नलगे, लक्ष्मण चव्हाण, शिवाजी मदने, गजानन मदने, अनिल खंदारे, पांडुरंग पवार, अभिनव जाधव ,रवी भोने, रामदास चव्हाण अरुण भोने या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

# ३१ मे पासून नाशिकमध्ये तीन दिवस कार रॅलीचा थरार



**५० स्पर्धक सहभागी होणार**

**नाशिक :** इंडियन नॅशनल रॅली चॅम्पियनशिप अर्थात आयएनआरसीची दुसरी फेरी नाशिकला होत आहे. वेस्टर्न इंडिया स्पोर्ट्स इंडिया (विसा) तर्फे ३१ मे ते २ जून या कालावधीत रॅली ऑफ महाराष्ट्र (ब्लू बँड एफएमएससीआय फोर व्हिलर आयएनआरसी २०२४) जिल्ह्यातील त्र्यंबक ते जव्हारपर्यंतच्या परिसरात होणार आहे. ८ वर्षांनंतर विसा या संस्थेला आयोजनाचा मान मिळाला असून, तब्बल ५० हून अधिक स्पर्धक त्यात सहभागी होणार असल्याची माहिती स्पर्धेचे सीओसी अश्विन पंडित यांनी पत्रकार परिषदेत दिली.

फेडरेशन ऑफ मोटार स्पोर्ट्स इंडिया (एफएमएससीआय) मान्यतेने या स्पर्धेचा प्रारंभ शुक्रवारी (दि. ३१ मे) त्र्यंबक रोडवरील ग्रेप कौंटी रिसॉर्ट येथे सायंकाळी ४:५६ वाजता होणार आहे. त्याआधी प्रत्यक्ष रॅलीला सुरुवात होण्यापूर्वी नाशिकमध्ये २७ मेपासूनच स्पर्धकांच्या गाड्या दाखल होणार आहेत. ग्रेप कौंटी हे रॅलीचे मुख्यालय ठेवण्यात आले असून, सपकाळ नॉलेजच्या ठिकाणी सर्व गाड्यांचे सर्व्हिस पार्क असेल. ३० मे या दिवशी वाहनांची कागदपत्र तपासणी, चालक-सहचालकांसाठी सूचना देणे, मार्गाची पाहणी करणे, प्रशिक्षण यासारखे कामकाज चालणार आहे.

३१ मे या दिवशी ग्रेप कौंटीमध्ये ४.५६ वाजता छोट्या रॅलीचा थरार अर्थात रंगीत तालीम रंगणार आहे. त्यानंतर त्र्यंबकेश्वर, मोरचुंडी, निळमाती, घोडीपाडा, पोशेरा, करोली, हिरवेपडा, मोखाडा यासारख्या ग्रामीण भागातील अवघड वळणदार रस्त्यांवरून रॅली रंगणार असल्याचे पंडित यांनी नमूद केले. १ आणि २ जूनला होणाऱ्या स्पर्धेचा मार्ग आणि वेळा पाहण्यासाठी आपण ळीर्रं.ैस.ळप या संकेतस्थळावर संपर्क करू शकतात. रॅलीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यंदा महिला स्पर्धेच्या जोड्याही सहभागी होत असल्याचे प्रेम काशीनाथ यांनी सांगितले.

# औजनंतर चिंचपूर बंधाराही भरला

## सोलापूरच्या पाणी पुरवठ्याची दीड महिन्याची चिंता दूर



**सोलापूर :** उजनी धरणातून सोडलेले पाणी बुधवारी चिंचपूर बंधाऱ्यात पोहोचले. जलसंपदा विभागाने औज आणि चिंचपूर बंधारे भरून घेतले आहेत. हे दोन्ही बंधारे भरल्यामुळे सोलापूर शहराची दीड महिन्यांचीपाणीचिंता दूर झाल्याचा दावा महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी केला.

सोलापूर शहराला उजनी ते सोलापूर जलवाहिनी, औज ते सोरेगाव पाणी पुरवठा योजना, हिप्परगा तलाव अशा तीन स्रोतांमधून पाणी पुरवठा होतो. औज बंधारा १५ दिवसांपूर्वी कोरडा पडला होता. हा बंधारा भरून घेण्यासाठीउजनी धरणातूनभीमा नदीत पाणी सोडण्यात आले. हे पाणी मंगळवारी औज बंधाऱ्यात पोहोचले होते.

बुधवारी पहाटे औज बंधारा भरून घेण्यात आला. त्यानंतर सकाळी चिंचपूर बंधाराही भरून घेण्यात आला.

गेल्या दोन्ही बंधाऱ्यांमध्ये मिळून सुमारे अर्धा टीएमसी पाणी आहे. नदीकाठी पाणी उपसा होउ नये म्हणून महावितरण कंपनीने वीजपुरवठा बंद ठेवला आहे. उजनी धरणाची पाणी पातळी वजा ५० टक्क्यांच्या खाली गेली आहे. यापुढील काळात या धरणातून शहरासाठी भीमा नदीत पाणी सोडता येणार आहे. शहराची मदार आता उजनी धरण क्षेत्रात अर्थात पुणे जिल्ह्यात होणाऱ्या पावसावर आहे.

# ...अन्यथा २०२४-२०२५ च्या प्रवेशावर बंदी

**मुंबई :** कॉलेजच्या गुणवत्ता वाढीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या 'महाविद्यालय विकास समिती'ची(सीडीसी) दहा दिवसात निर्मिती करून समितीच्या कामकाजाचा अहवाल दहा दिवसांत सादर करा. अन्यथा २०२४-२०२५या शैक्षणिक वर्षाचे प्रवेश देण्यास बंदी करण्यात येईल, अशी ताकीद मुंबई विद्यापीठाने दिली आहे.महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ मधील कलम ९७ नुसार महाविद्यालयात सीडीसीस्थापणे बंधनकारक आहे. तसेच या समितीचा वार्षिक अहवाल प्रत्येक वर्षी विद्यापीठाला सादर करणे बंधनकारक आहे.

मात्र या नियमाबाबत कधी विद्यापीठाकडून पाठपुरावा करण्यात न आल्यानेअनेक महाविद्यालयांनी हानियम धाब्यावर बसविला आहे. इतकी वर्षे चालढकल केल्यानंतर महाविद्यालयांना तातडीने समितीची निर्मिती करण्यास सांगण्यात आले आहे. परंतु, समितीची रचना आणि निर्मितीची कार्यपद्धती पाहता दहा दिवसात समिती स्थापण्याचे विद्यापीठाचे आदेश निव्वळ धूळफेक ठरणार आहेत, असा आरोप प्राध्यापकांकडून करण्यात येत आहे. समितीची रचना आणि निर्मितीसमितीतील१४सदस्यांमध्ये तीन मान्यताप्राप्त प्राध्यापक आणि एक शिक्षकेतर कर्मचारी यांचा समावेश असतो.याचार सदस्यांची निवड त्या त्या गटातून निवडणुकीच्या माध्यमातून होते.

# साताऱ्यातील कण्हेर धरणात मृत माशांचा खच, कारण मात्र अनभिज्ञ

सातारा : सातारा तालुक्यात असलेल्या कण्हेर धरणातील मासे अचानक मृत्यूमुखी पडले असून, धरणाच्या काठावर मृत माशांचा अक्षरश: खच पडला आहे. अनेक वर्षांनंतर धरणातील मासे मृत्यूमुखी पडल्याची घटना घडल्याने नागरिकांमधून तर्क-वितर्क लढविले जात आहे.

सातारा-मेढा मार्गावर असलेल्या कण्हेर धरणाची पाणीसाठवण क्षमता १०.१० टीएमसी इतकी आहे. या धरणातील पाणीपातळी उन्हामुळे खालावली असून, धरणात सध्या दीड टीएमसी पाणी उपलब्ध आहे. बुधवारी दुपारी काही नागरिकांना या धरणातील पाण्यावर मृत मासे तरंगताना आढळून आले. तसेच काही ठिकाणी काठावरही मृत माशांचा खच पडल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. धरणातील पाणीपातळी खालावल्यानंतर माशांना पाण्यातून मिळणारा प्राणवायू अपूरा पडू लागतो. त्यामुळे ते मृत्यूमुखी पडले असावेत, असा कयास काही नागरिकांनी बांधला.

मात्र, यामागे वेगळेच कारण असल्याचा आरोप करत जिल्हा प्रशासनाने या प्रकरणासह धरणात सुरू असलेल्या मासेमारीची सखोल चौकशी करावी, अशी मागणी गरुडा साम्राज्य सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आदित्य गायकवाड यांनी केली आहे. तशा आशयाचे निवेदन त्यांनी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना दिले आहे.

# 'सेझ'चे भूखंड ताब्यात घेण्यास तात्पुरती स्थगिती

**नाशिक :** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्यानाशिकप्रादेशिक कार्यालयाने सिन्नर तालुक्यातील गुळवंच आणि मुसळगाव येथे विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) उभारण्यासाठी इंडिया बुल्स इंडस्ट्रियल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडला दिलेल्या क्षेत्रापैकी ५१२ हेक्टर क्षेत्र भूखंड ताब्यात घेण्याची प्रक्रिया मार्चमध्ये पूर्ण केली; मात्र इंडिया बुल्स कंपनीने कारवाईला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. त्यामुळे न्यायालयाचा निकाल जाहीर होईपर्यंत ही प्रक्रिया तात्पुरती थांबवण्यात आली असल्याचे समजते.

इंडिया बुल्सने गतवर्षी ऑक्टोबरमध्ये एमआयडीसीला नवीन प्रकल्प सुरू करण्यासाठी काही कालावधी देण्याचा प्रस्ताव दिला होता; मात्र तो प्रस्ताव फेटाळत एमआयडीसीने उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून १८ वर्षांपासून उद्योग न उभारलेले औद्योगिक भूखंड ताब्यात घेण्याची प्रक्रिया १ मार्चपासून सुरू करून ती पूर्ण केली होती. केंद्र सरकारने चीनप्रमाणे देशातही विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) उभारण्याचे धोरण जाहीर केले. त्यानुसार सिन्नर तालुक्यातील मुसळगाव व गुळवंच या गावांच्या शिवारात इंडिया बुल्स सेझ उभारण्याची घोषणा केली.

राज्य शासनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून मुसळगावच्या ८९ शेतकऱ्यांकडून ४१८.०२ हेक्टर व गुळवंचच्या १९८ शेतकऱ्यांकडून ९७६.१५ हेक्टर क्षेत्र एमआयडीसीने खरेदी केले. त्यातील पंधरा टक्के विकसित भूखंड जमीनधारकांना परत केल्यानंतर शासनाने उर्वरित ९०० हेक्टर भूखंड एमआयडीसीच्या माध्यमातून इंडिया बुल्सला औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पासाठी भाडेतत्त्वावर दिली आहे.

# काँग्रेसची आता विधानसभेसाठी पेरणी, सांगलीत कार्यकर्त्यांचा स्नेहमेळावा




**सांगली :** सांगली लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीच्या निमित्तानेकाँग्रेसपक्षाला जिल्ह्यात उभारी आल्याचे दिसून आले. लोकसभा निवडणुकीच्या निकालाचे काय होईल ते दि. ४ जूनला स्पष्ट होईल. पण, तोपर्यंत काँग्रेस पक्षासाठी तयार झालेल्या वातावरणाचा फायदा घेण्यासाठी विधानसभेचे इच्छुक कामाला लागले आहेत. त्यातूनच सांगलीत सोमवारी सर्व काँग्रेसप्रेमी कार्यकर्त्यांचा स्नेहमेळावा झाला. या मेळाव्याची सर्वच राजकीय पक्षांमध्ये चांगलीच चर्चा रंगली आहे.

सांगली लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या वाट्याची जागा उद्धवसेनेला गेली. उद्धवसेनेकडून चंद्रहार पाटील निवडणुकीच्या मैदानात उतरले होते. पण, राज्यात महाविकास आघाडी असली तरी जिल्ह्यात आघाडीची बिघाडी झाली होती. महाविकास आघाडीकडून उमेदवारी डावलल्यामुळे काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष विशाल पाटील यांनी बंडखोरी केली. उमेदवारी नाकारल्याच्याराजकारणामुळेविशाल पाटील यांच्या बाजूने पोषक वातावरण झाले. ग्रामीण भागातील काँग्रेसचे नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये प्रथमच जोश दिसून आला. काँग्रेस नेते, कार्यकर्त्यांचा जोश आणि वसंतदादाप्रेमींची मोठी साथ विशाल पाटील यांना मिळाली. त्यामुळे तिरंगी असणारी लढत अपक्ष विशाल पाटील विरुद्ध भाजपचे खासदार संजय पाटील अशी झाली. या दुरंगी लढतीत कोण सांगलीचा खासदार होणार हे ४ जूनला ठरणार आहे.

पण, त्यापूर्वी सांगली लोकसभा निवडणूक क्षेत्रात काँग्रेससाठी पोषक वातावरणाचा फायदा घेण्यासाठी विधानसभेचे इच्छुक मैदानात उतरले आहेत. सोमवारी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांनी सांगलीत सर्व काँग्रेसप्रेमी कार्यकर्त्यांचा स्नेहमेळावा घेतला. या कार्यकर्त्यांना स्नेहभोजनही यानिमित्ताने दिले. या स्नेहमेळाव्यास काँग्रेस प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. विश्वजीत कदम, लोकसभेचे अपक्ष उमेदवार विशाल पाटील यांची विशेष उपस्थिती होती. या स्नेहमेळाव्यास सांगली विधानसभेच्या इच्छुक जिल्हा बँकेच्या उपाध्यक्षा जयश्रीताई पाटील यांनी जाण्याचे टाळल्याचे दिसून आले. काँग्रेसच्या या मेळाव्यास राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही पदाधिकारी, कार्यकर्त्यांनीही हजेरी लावली होती.मदनभाऊ पाटील युवा मंचच्या कार्यकर्त्यांनी फिरविली पाठ

पृथ्वीराज पाटील यांनी काँग्रेसप्रेमी कार्यकर्त्यांचा स्नेहभोजन मेळावा सांगलीत आयोजित केला होता. या मेळाव्यास मदनभाऊ पाटील युवा मंच आणि मदनभाऊ गटाच्या कार्यकर्त्यांनी जाणे टाळल्याची चर्चा सांगलीत मंगळवारी रंगली होती. मदनभाऊ पाटील युवा मंचच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर त्यांनीही आमच्या गटाचे कार्यकर्ते गेले नव्हते, असे स्पष्ट सांगितले.

# निवड झाली, पण नियुक्तीपत्र कधी? समुपदेशनसाठी शिक्षकांचा आक्रोश

, मुंबई महापालिकेचा संथ कारभार

मुंबई : शिक्षक भरतीच्या माध्यमातून ज्या उमेदवारांची निवड (इचउ डहळज्ञीहरज्ञ इहरीरींळ णविरींश) झालेली आहे, परंतु ज्या उमेदवारांचे समुपदेशन अद्याप बाकी आहे अशा उमेदवारांचा आक्रोश सध्या पाहायला मिळत आहे. राज्यातील इतर ठिकाणच्या उमेदवारांचे समुपदेशन होऊन बहुतांश उमेदवारांना त्यांची नियुक्तीची ठिकाणंही जाहीर करण्यात आली आहेत. मात्र मुंबई महापालिकेचा कारभार मात्र वेगळा असल्याचं दिसतंय. बीएमसीच्या शिक्षण विभागाकडून नियुक्त झालेल्या उमेदवारांचे अद्याप समुपदेशन झालं नाही.

शाळा सुरू होण्यास सध्या काहीच दिवस बाकी असून उमेदवारांचे समुपदेशन कधी होणार आणि त्यांना नियुक्ती कधी मिळणार याची मात्र अनिश्चितता असल्याचं दिसतंय. त्यामुळे लवकरात लवकर समुपदेशन करून नियुक्ती देण्यात यावी अशी मागणी उमेदवारांकडून करण्यात आली आहे.

फक्त डॉक्युमेंट्स व्हेरिफिकेशन झालं

फक्त बीएमसीमध्ये ही प्रक्रिया राहिली असून कागदपत्रे तपासून कुणी पात्र ठरलं आणि कुणी अपात्र ठरलंय याचीही माहिती अद्याप जाहीर झाली नाही. १५ जूनपर्यंत शाळा सुरू होणार असून त्या आधी या उमेदवारांचं समुपदेशन होऊन त्यांना नियुक्तीचे ठिकाण समजावं अशी मागणी करण्यात येत आहे.

राज्यात अनेक जिल्हा परिषदा असतील किंवा नगरपालिका, महानगरपालिका असतील, त्या-त्या ठिकाणी समुपदेशन प्रक्रिया पूर्ण करून नियुक्ती कोणत्या ठिकाणी करण्यात आली आहे हे जाहीर करण्यात आलंय. मात्र मुंबई महानगरपालिकेमध्ये ज्या उमेदवारांचे या ठिकाणी सिलेक्शन झालेलं आहे त्या उमेदवारांचं फक्त डॉक्युमेंट व्हेरिफिकेशन झालं आहे. बाकी प्रक्रिया मात्र अपूर्णच राहिल्याचं दिसतंय.

काय आहेत उमेदवारांच्या मागण्या?

शिक्षण सेवक किंवा शिक्षण सेविका या पदाकरिता पात्र असलेल्या उमेदवारांचे समुपदेशन करण्याकरिता वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. त्यामध्ये त्यांनी असं सांगितलं आहे की पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षक भरती प्रक्रिया मधून २५ फेब्रुवारी २०२४ रोजी जाहीर झालेल्या, मुंबई महानगरपालिका अधिनस्त प्राथमिक शिक्षण सेवक पदाची आमची निवड झालेली असून त्या अनुषंगाने दिनांक ४ मार्च ते १२ मार्च रोजी सर्व शैक्षणिक कागदपत्रांची पारदर्शक पद्धतीने व्हेरिफिकेशन झालं आहे.

१६ मार्च २०२४ रोजी लोकसभेची आदर्श आचारसंहिता लागू झाल्याने पुढील प्रक्रिया राबविता येणार नसल्याचे जाहीर करण्यात आलं होतं. परंतु आता संपूर्ण महाराष्ट्राचे आदर्श आचारसंहिता मुक्त झालेला आहे. त्यामुळे आम्हा लोकांना आता तात्काळ या ठिकाणी जॉयनिंग देण्यात यावे.

मुंबई महानगरपालिका येथे ७९८ जणांची शिक्षण सेवक पदावर शिफारस निवड करण्यात आलेली असून शिफारस केलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी प्रक्रिया सुद्धा पूर्ण झालेली आहे. त्यामुळे लवकरात लवकर समुपदेशन प्रक्रिया पूर्ण करावी आणि पात्र शिक्षकांना पदस्थापनेची माहिती द्यावी.

# पोदार इंटरनॅशनल स्कुल दौंड प्रशालेचा दहावी सी बी एस ई बोर्डाचा निकाल १००%



**देऊळगाव राजे :** पोदार इंटरनॅशनल स्कुल दौंड चादहावीच्या पहिल्या बॅच चा निकाल १००%लागला आहे, ही प्रशाला ,विध्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवणारी प्रशाला म्हणूनपरीसरात ओळखली जाते, प्रशालेत विध्यार्थी विकासाचे उपक्रम तसेंच निरनिराळ्या स्पर्धा परीक्षांचे आयोजन हि प्रशालेमध्ये केले जाते. त्या अनुषंगानेच, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ माहे फेब्रुवारी मध्ये झालेल्या दहावी सी बी एस ई बोर्डाच्या परीक्षेसाठी प्रशालेतील एकूण ३९ विध्यार्थी हे दहावी बोर्डाच्या परीक्षेसाठी बसले होते.त्यापैकी सर्वच्या सर्व ३९ विध्यार्थी हे उत्तुंग यश संपादन करून, पास झाले. व प्रशालेचा दहावी सीबीएसई बोर्डाचा निकाल हा शंभर टक्के लागला.

यामध्ये , प्रशालेत विभागून प्रथम क्रमांक ,कु. शौनक भापकर - ९४ %, प्रथम क्रमांक कु.श्रुती रामजी गुप्ता - ९४% द्वितीय क्रमांक - कु. सेल्वी राणी - ९३.८ %, तृतीय क्रमांक, कु. ईशान सुनील भागवत - ९३.४% चतुर्थ क्रमांक , कु. विशाल सूर्यकांत गिरमकर -९०.३% पाचवा क्रमांक ,कु.वेदांत हंबीररावं धुमाळ, - ९०.२% गुण मिळवून, सदरील विध्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले. प्रशालेतील तब्बल आठ विध्यार्थी हे नव्वद टक्के पेक्षा अधिक च्या श्रेणि मध्ये पास झाले.तसेच विषयानुसार निकाल, पुढील प्रमाने, इंग्रजी विषयात प्रथम क्रमांक - शौनक भापकर- ९८ गुण , हिंदी विषयात प्रथम क्रमांक - सेल्वी राणी - ९७ गुण, गणित विषयात प्रथम क्रमांक - श्रुती गुप्ता - ९६ गुण, विज्ञान विषयात प्रथम क्रमांक - शौनक भापकर - ९७ गुण समाजशास्त्र विषयात प्रथम क्रमांक - श्रुती गुप्ता - ९८ गुण, माहिती आणी तंत्रज्ञान, विषयात प्रथम क्रमांक - शौनक भापकर - ९६ गुण, सूर्यांशु कुमार - ९६ गुण. सदरील सर्व यशस्वी विध्यार्थी यांना, तत्कालीन प्राचार्य विशाल जाधव, तसेच प्रशालेच्या नवोदित प्राचार्या स्वाती कणसे, उप प्राचार्या लक्ष्मी रथ, वर्गशिक्षिका पूनम जाधव, तसेच सर्व शिक्षक वृंद यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

यावेळी बोलताना, प्रशालेच्या नवनिर्वाचित प्राचार्या स्वाती कणसे यांनी, प्रत्येक विध्यार्थी हा देशाचे भवितव्य आहे.आणी प्रत्येकाने जीवनामध्ये उत्तुंग यशाची पातळी गाठून, आपल्या आई वडिलांचा,शाळेचा, गावाचा, देशाचा नावलौकिक वाढवावा असे प्रतिपादन करून, सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी, ॲडमिन मॅनेजर, स्वप्नील जुमडे, शिक्षक महेश मोरे, उपप्राचार्या लक्ष्मी रथ, सर्व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# झाडाणी भूखंडप्रकरणी कारवाईसाठी स्थानिक ग्रामस्थांनी दिला आंदोलनाचा इशारा

**सातारा :** झाडाणी, ता. महाबळेश्वर मोल मजुरी करून जीवन जगत आहोत.

त्या ठिकाणी जमीन, जागा सोडून आल्याची माहिती मिळताच स्थानिक जमीन दलालांनी नवीन वस्तीचा पत्ता शोधून ग्रामस्थांना जमीन विकता का? असे विचारल्यानंतर ग्रामस्थांनी जमीन विकण्यास नकार दिला. त्यानंतर एजटांनी स्थानिक भूमिपुत्रांनी जमीन विकावी यासाठी प्रयत्न केला.

जमीन विकली नाही तर ती जमीन शासन जमा होईल. त्यापेक्षा ती जमीन विकून त्या जमिनीचा मोबदला घ्या, अशी भीतीं ग्रामस्थांच्या मनात निर्माण केली. त्या भितीपोटी गावातील काही ग्रामस्थ जमीन विकण्यासाठी तयार झाले. काही ग्रामस्थ अशिक्षित असल्याकारणाने ग्रामस्थांची दिशाभूल करून फसवणूक करण्यात आली होती .ही जमीन चंद्रकांत वळवी, जिल्हा नंदुरबार आणि त्यांचे नातेवाईक यांच्या नावे करण्यात आली. ज्या ग्रामस्थांचा विरोध होता त्या ग्रामस्थांना वकिलामार्फत खोटया नोटीसी पाठवून जमीन विकण्यास भाग



अति दुर्गम कांदाटी खोऱ्यातील जमीन गैर व्यवहाराबाबत सातारा निवासी उपजिल्हाधिकारी श्री नागेश पाटील यांना निवेदन देताना स्थानिक ग्रामस्थ...

पाडले. अशी ग्रामस्थांनी तक्रार केली.

श्री. चंद्रकांत वळवी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केले परंतु आम्हाला त्यांनी जुमानले नाही. या जमिनीमध्ये हनुमान मंदिर तसेच ग्रामदैवत श्री लव्हेश्वर मंदिर सर्व्हे नंबर १२ मध्ये आहे. या मंदिराकडे जाण्यासाठी रस्ता चंद्रकांत वळवी यांनी ठरल्याप्रमाणे ठेवला नाही. मंदिर हे पुरातन असल्यामुळे वंशपरंपरेने त्याची पुजाअर्चा होणे तसेच माहेरवासिनेचे नारळ किंवा ओटी भरणे तसेच नित्य देवपुजा यासाठी रायगड जिल्हयामधून ग्रामदैवतेच्या मंदिरामध्ये वर्षातुन एक ते दोन वेळा येत असतो. मात्र संबंधित चंद्रकांत वळवी, त्यांचे परिवार धाकधपटशाही आणि दांडगाईने संबंधित जागेमध्ये आणि मंदिरामध्ये प्रवेश करू देत नाहीत, त्यामुळे आमच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत. असे आता स्थानिक भूमिपुत्र सांगू लागलेले आहेत.

सर्व्हे नंबर १२ लगत श्री लव्हेश्वर ईनामी जमीन १७० एकर आणि वहिवाटी नावे सामूहिक जमीन आहे. तरी ग्रामस्थांना या क्षेत्रात जाण्या-येण्याकरता चंद्रकांत वळवी व नातेवाईक यांच्या जागेतून रस्ता होता परंतु ग्रामस्थांना फसवून या वहिवाटी रस्त्यावर पाबंदी घालण्यात आली असून त्या क्षेत्रातून जाण्या-येण्यास बंदी घातली आहे.

या ठिकाणी जायचे असल्यास दोडाणी या गावात वाहने उभी करून चार ते पाच किलोमिटर पायी चालत जावे लागते आणि तेही त्यांच्या नोकरदारांना विचारून पायी जाऊ शकतो. श्री. चंद्रकांत वळवी यांनी एकदा स्थानिक भूमिपुत्रांशी संपर्क साधला नाही. या एजंटने ग्रामस्थांची फसवणूक करून पॉवर ऑफ ऑटर्नी नावे करून संपूर्ण जमीन हडपली आहे. सर्व ग्रामस्थांची फसवणूक केली आहे. या एजंटने काही जमिनीचा मोबदला न देता पूर्णपणे जमीन मूळ मालकाच्या नावे केली. तरी याविषयी योग्य ती चौकशी करून न्याय मिळवून द्यावा. या प्रकरणात कायद्याचे उल्लंघन झाले असून गंभीर गुन्हा झाला आहे. सर्व कागदपत्रे बोगस बनवून दिशाभूल करून जमिनी खरेदी केल्या आहेत. ज्या जमीनींचे खरेदीपत्र झालेले आहे. त्यांचे सर्व कागदपत्र पडताळून एस.आय.टी .मार्फत चौकशी व्हावी, त्यामुळे मयत असणाऱ्या व्यक्तींच्या नावे खरेदीपत्र कसे झाले. त्याचबरोबर खरेदीपत्र करणारे दुय्यम निबंधक, एजंट, दस्त लेखनिक तसेच या दस्तऐवजाची नोंद करणारे तत्कालीन तलाठी,

**वीस वर्षे पूर्वी या जमिनीचा व्यवहार झाला असला तरी आतापर्यंत महसुली अधिकारी म्हणून ज्या ज्या अधिकाऱ्यांचा व पोलीस यंत्रणेचा सहभाग आहेत त्या सर्वांची चौकशी व्हावी अशी मागणी आता स्थानिक ग्रामस्थांनी केलेले आहे दरम्यान या प्रकरणाची माहिती काही कार्यकर्त्यांना मिळाली पण त्याबाबत ठोस पावले उचलले नसल्याने आता सामाजिक कार्यकर्ते श्री सुशांत मोरे यांनी या प्रकरणाचा पाठपुरावा करून स्थानिक झाडाणी ग्रामस्थांना दिलासा देत आहेत.**

सर्कल, तहसालदारांची खातेनिहाय चौकशी करावी आणि वंशपंरपरागत असलेली जमीन आम्हाला परत मिळावी, तसेच पुरातन श्री लव्हेश्वर मंदिर येथे जाण्यासाठी व पुजा अर्चा करण्यासाठी रस्ता तातडीने मिळावा. गावठाणातील आमची जागा सातबाराप्रमाणे आम्हांला परत मिळावी. आम्हाला तेथे शेती आणि राहण्यासाठी तसेच उपजीविका करण्यासाठी परवानगी मिळावी, ही कारवाई दि. ९ जूनपर्यंत प्रशासनाने करावी अन्यथा सामाजिक कार्यकर्ते सुशांत मोरे यांच्याबरोबर सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झाडांनी गावचे ग्रामस्थ उपस्थित निवेदनाद्वारे दिलेला आहे सदर निवेदनाची प्रत निवासी उपजिल्हाधिकारी श्री नागेश पाटील यांना देण्यात आलेली आहे.

सध्या हा देशभर चर्चेचा विषय ठरलेला आहे. आचारसंहिता असल्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार हे भूमिका घेत नाहीत .परंतु, आचारसंहिता उठल्यानंतर या प्रकरणाबाबत चांगलेच राजकारण होईल .असे चिन्ह दिसू लागलेले आहे.

## कुत्रे चावल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** पाळीव श्वानाबाबत योग्य ती खबरदारी न घेता मोकळा सोडल्याने त्याने एकास चावा घेतला. याप्रकरणी सातारा शहर पोलिस ठाण्यात एकावर गुन्हा नोंद झाला आहे.

याप्रकरणी ड. अर्जुन जगन्नाथ वाघ (रा. वाढे फाटा खेड, सातारा) यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार नितीन भोसले (पूर्ण नाव नाही, रा. कोयना सोसायटी, सदरबझार सातारा) यांच्याविरोधात गुन्हा नोंद झाला आहे.

## दोन दुकानातून चोरी

**सातारा :** सातारा शहरातील विसावा नाका येथील दोन दुकानात चोरी झाली. अज्ञात चोरट्याने रोख रक्कम तसेच इतर साहित्य लंपास केले. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात चोरीचा गुन्हा नोंद झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, याप्रकरणी तेजस किशोर सोनावणे (रा. विसावा कॅम्प, सातारा) यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार दि.२० मे रोजी रात्रीच्या सुमारास चोरीचा प्रकार घडला आहे. फिर्यादीच्या दुकानाच्या गल्ल्यात ठेवलेली ६ हजारांची रोकड तसेच, तेथील दुसऱ्या एका दुकानातूनही ६ हजारांची रक्कम आणि टॅब, की बोर्ड, माऊस असा सर्व मिळून सुमारे १७ हजारांचा ऐवज चोरून नेण्यात आला आहे.

सातारा शहर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यावर गुन्हा नोंद झाला आहे. हवालदार पोळ तपास करीत आहेत.

# देऊर येथील सर्जेराव जगन्नाथ कदम यांच्या शेतीच्या सोलरचे अवकाळीने नुकसान



शेतात अशाप्रकारे उखडून पडलेला सोलर (छाया:शुभम गुरव)

**आसनगाव :** देऊर ता कोरेगाव येथील शेतकरी सर्जेराव जगन्नाथ कदम यांच्या शेतातील सोलरचे परीसरात सोमवारी झालेल्या अवकाळी पाऊसात लाखो रूपयांचे नुकसान झाले आहे.सोमवारी अवकाळी पाऊसाने उत्तर कोरेगाव परीसरात धुमाकूळ घातला यामध्ये देऊर येथील विठ्ठल सर्जेराव कदम याच्या शेतातील सोलर उखडून पडला यामध्ये त्यांचे नुकसान झाले आहे.

# 'प्रेरणाशक्ती माता' हा ग्रंथ, क्षेत्रीय इतिहासाचे पहिले पान : डॉ. श्रीपाल सबनीस

## मळोलीतील प्राथमिक शिक्षिका यांच्या मृत्युनंतर ३० वर्षांनी तयार झाला ३०० पानी ग्रंथ

**वाई :** प्रेरणाशक्ती माता हा ग्रंथ म्हणजे केवळ कौसल्या महादेव रोकडे यांचा गौरव नसून शिक्षिका असलेल्या सर्व मातांचा गौरव आहे. काळजाला भिडणारी मनोगते या ग्रंथात आहेत. हे केवळ रोकडेबाई यांचे चरित्र नसून मळोली गावाचे चरित्र आहे. तेथील जीवन शिक्षण मंदिर या शाळेचे चरित्र आहे. हा ग्रंथ म्हणजे क्षेत्रीय इतिहासाचे पहिले पान आहे राष्ट्रीय एकात्मतेच्या वारशाचे दर्शन घडवणारा ग्रंथ आहे'असे मत ८९ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा.डॉ.श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले. ते अकलूज येथे कांतीलाल सांस्कृतिक भवन येथे आयोजित केलेल्या ,'प्रेरणाशक्ती माता-कौसल्या महादेव रोकडे स्मृतिगौरव ग्रंथाचे प्रकाशन समारंभात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना बोलत होते. कौसल्या महादेव रोकडे उर्फ माता या प्राथमिक शिक्षिका मळोली येथे



१९६६ ते १९८८ या काळत काम करीत होत्या. त्यांचे निधन २१ एप्रिल १९९४ ला झाले. मृत्युनंतर त्यांचे विद्यार्थी, सहकारी यांनी ३०० पानाचा ग्रंथ सिद्ध केला. त्या पार्श्वभूमीवर प्रेरणाशक्ती माता या ग्रंथाचे प्रकाशन प्रमुख अतिथी म्हणून डॉ.प्रदीप आवटे व डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते करण्यात आले होते. साहित्यवेल प्रकाशन सातारा व रोकडे, करमाळकर व बाबर परिवार यांनी या समारंभाचे आयोजन केले होते. मळोली येथील माता यांचे विद्यार्थी संपादक प्रा. डॉ. सुभाष वाघमारे व माता यांची नात मीनल अमोल उनउने ,यांनी या ग्रंथाचे संपादन केले आहे. यावेळी शरद करमाळकर, डॉ. रविंद्र रोकडे, कृष्णा चिंचकर, अरुणा करमाळकर, प्रा. डॉ. बाळासाहेब घोरपडे, प्रताप गुरव, अमोल उनउने, सम्यक खवळे, श्रीनिवास कदम, इत्यादीं अनेकांची यावेळी उपस्थिती होती.

या ग्रंथाचे महत्व अधोरेखित करताना ते पुढे म्हणाले की'गावागावात असे ग्रंथ तयार व्हायला हवेत. पायाभूत शिक्षण, सामाजिक जाणीव या ग्रंथातून कळते. चौथ्या पिढीपर्यंतचा इतिहास या ग्रंथात आहे. आजकाल रामाचा आदर्श सगळे स्वीकारतात पण रामाच्या आईचे कौसल्येचे मंदिर कोठे आहे? खरे तर हे पुस्तक कौसल्यामातेचे खरे मंदिर आहे. या कार्यक्रमात माता यांचे सहकारी यांना शिक्षक जीवन गौरव सन्मान देऊन आपल्याला मोठे पुण्य मिळाले आहे. आयुष्याची संध्याकाळ या पुरस्काराने समाधानी जाणार आहे. या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे ज्या उपेक्षितांना आपण न्याय दिला नाही अशा वर्गातून येऊन इतके चांगले संपादन प्रा.डॉ. सुभाष वाघमारे यांनी केले आहे. ब्राह्मण ब्राह्मणेतर अशी भूमिका न घेता आपल्याला शिकवणाऱ्या सर्व शिक्षक यांचा सन्मान इथे झाला आहे. अत्यंत विवेकवादी भूमिका या ग्रंथाची आहे .अशा प्रकारे राष्ट्र निर्मिती ,गाव निर्मितीच्या कार्यात ज्यांनी योगदान दिले त्यांच्या विषयी कृतज्ञता या ग्रंथात आढळते. मळवली गावच्या शाळेतील राष्ट्रीय एकात्मतेच्या वारशाला मी वंदन करतो. रोकडे बाई या गावच्या माता झाल्या. माणुसकी हाच या मातेच्या आयुष्याचा सारांश आहे. यात लेखकांचा ,संपादकांचा कोणताही स्वार्थ मला आढळत नाही. कृतज्ञता व्यक्त करायची ,गावची, आपली कहाणी सांगायची हेच या ग्रंथाचे प्रयोजन आहे. आताच्या काळात महाराष्ट्रात मला असा ग्रंथ पहायला मिळालेला नाही. आजकाल घरातले लोक देखील म्हातारया माणसांना विचारत नाहीत या काळात शिक्षकांचे सत्कार केल्याने त्याना समाधान तर मिळाले पण त्यांचे आयुष्य देखील वाढणार आहे. शिक्षकांच्या विषयीचे ऋण कृतज्ञता व्यक्त करून फेडणे हेच कर्तव्य आहे. आज समाजात चांगुलपणाचे हॅमरिंग करण्याची गरज असल्याचे यावेळी त्यांनी आवर्जून सांगितले.



सालपे घाटात ठिक-ठिकाणी रोलींग तुटले आहेत.

# सालपे घाटातील कठडे धोकादायक

**आदर्की :** सातारा - पुणे मार्गावरील वाठार स्टेशन - लोणंद दरम्यानच्या सालपे घाटात लोंखंडी रोलीग तुटले आहेत कठडे तुटले आहेत तरी संबंधित विभागाच्या दुर्लक्षामुळे अपघातात वाढ झाल्यामुळे प्रवाशी व वाहन धारकातुन नाराजी व्यक्त होत आहे

सातारा - लोणंद - पुणे या मार्गावर टोल नाका नसल्यामुळे पुणे मुंबई नाशिक नगर बारामती आदी औदयगिक वसाहती मधे जाणारी जड वाहने या मार्गावरून जातात त्यामुळे अपघातात वाढ होत असल्याने शासन प्रत्येक वर्षी लाखो रुपये खर्चून रस्त्यावर खर्च करते त्या बरोबर संरक्षक जाळ्या संरक्षक कठडे संरक्षक भिंती बांधुन वाहन धारकाची सुरक्षिता जपली जाते

रस्ताचे खडीकरण डांबरीकरण करताना डांबर कमी प्रमाणात वापरल्यामुळे रस्त्यावर खडडे पडतात. संरक्षक कठडे व संरक्षक भिंत बांधतांना सिंमेट खडी योग्य प्रमाणात वापरली नसल्याने कडठे ठासळू लागले आहेत. धोम बलकवडी कालव्यावरील पुलाचा कठडा तोडून ट्रक खाली गेल्याची घटना महिन्यापुर्वी घडली होती तो कठडा तुटलेला तसाच आहे.सालपे घाटात ठिकठिकाणी लोखंडी रॉड टाकुन संरक्षक जाळी उभारली आहे त्याचा दर्जा ही चांगला प्रतिचा नसल्याने व रॅलीग खोलवर रोवले नाहीत त्यामुळे जड वाहने धडकुन ठिक ठिकाणी रोलींग तुटले आहेत तेही दुरुस्त केली नसल्याने अपघात रोखण्यासाठी ती दुरुस्त करण्याची मागणी वाहन धारक प्रवाशी यांच्यातुन होत आहे.

# बालपणात झालेले वारकरी संस्कार दिर्घकाळ आनंद देतात : ह.भ.प बंडातात्या कराडकर

**आदर्की :** बेसुमार गतिमान झालेल्या जगात मुलांवर संस्कार करण्यासाठी आई-वडिलांना वेळ नाही अन् संस्कार कुठे पैशाने विकत घेता येत नाहीत.लहानवयात चिखलाला कोणताही आकार देता येतो पण मोठेपणात मोडेल पण वाकणार नाही अशी अवस्था होते. मुलांवर उत्तम संस्कार हे बालवयातच झाले पाहीजे. असे उद्गार ह.भ.प. बंडातात्या कराडकर यांना काढले.



बिबी. ता. फलटण येथे ह.भ.प. विजय बोबडे गुरूजी यांच्या मार्गदर्शनाने सुरू असलेल्या बाल वारकरी संस्कार शिबिरात विनामूल्य प्रवेश असून पहाटे ५.०० ते रात्री ८.०० पर्यंत धावणे, योगा.प्राणायाम, मैदानी खेळ, ज्ञानेश्वरी पाठ, गीतेचा पाठ, व्याख्यान, मृदंग, तबला, हार्मोनियम प्रशिक्षण, हरिपाठ किर्तन यातून १०० मुलांवर उत्तम संस्कार होत आहेत.

आणि ही काळाची गरज आहे. असे प्रतिपादन ह.भ.प. बंडातात्या कराडकर यांनी केले.यावेळी जनाआप्पा बोबडे, सुरेश महादेव बोबडे, सोनवले वसंतराव, मोरेश्वर महाराज, जगन्नाथ बोबडे हे उपस्थित होते.

## डॉ.सुधा अण्णासाहेब होवाळे यांचे निधन



**सातारा :** प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुधा अण्णासाहेब होवाळे वय- ८५ यांचे दीर्घ आजाराने बुधवारी २२ मे रोजी दुपारी निधन झाले. सायंकाळी साडेसात वाजेपर्यंत त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी सदर बाजार येथील होवाळे हॉस्पिटल येथील त्यांच्या निवासस्थानी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर रात्री आठ वाजता माहुली येथील कैलास स्मशानभूमीतील विद्युतदाहीनीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

त्यांच्या पाठीमागे पती प्राचार्य अण्णासाहेब होवाळे, मुलगा डॉ.सुबोध, स्नुषा डॉ.मृणालिनी, मुली डॉ.स्वाती गायकवाड व डॉ. प्रज्ञा मुनतोडे, जावयी डॉ.संजय गायकवाड व डॉ. प्रमोद मुनतोडे आणि नातवंडे असा परिवार आहे.

## दुचाकीची चोरी

सातारा : सातारा शहरातील रविवार पेठेत कंपाऊंडच्या आत अंगणात लावण्यात आलेली दुचाकी चोरून नेण्यात आली. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा नोंद झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, याप्रकरणी इब्राहीम कमब्रुद्दीन खान (रा. तक्रार दिलेली आहे. त्यानुसार दि. १७ ते १८ मे रोजी दरम्यान ही घटना घडली आहे. अज्ञाताने दुचाकी (एमएच,११. एएम, ५७८६) ची चोरी केली. या दुचाकीची किंमत सुमारे २० हजार रुपये होती. सातारा शहर पोलिस ठाण्यात नोंद झाली आहे. पोलिस चोरट्याचा शोध घेत आहेत.

# चंद्रकांत सुतार यांचे योगदान बिबी गावासाठी कौतुकास्पद

**आदर्की :** प्राथमिक शाळेचा विद्यार्थी पट कमी झाला होता व ग्रामस्थांचा शाळेकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला होता त्यासाठी चंद्रकांत सुतार गुरुजी यांनी विद्यार्थ्यां व पालकांना विचार प्रबोधन करून शाळेचा पट व गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न केल्याने बिबी गावची भावी पिढी आदर्श बनवण्याचे प्रामाणिक काम केल्याने चंद्रकांत सुतार गुरुजी यांचे ज्ञानदान विसणार नसल्याचे जेष्ठ नागरिक जर्नाधन बोबडे यांनी सांगितले.



बिबी शाळेचे सेवानिवृत शिक्षक चंद्रकांत सुतार व उषा सुतार यांचा सप्तीनिक सत्कार करताना बिबीचे सरपंच रूपाली बोबडे विशाल बोबडे जर्नादन बोबडे बळवंतराव नलवडे आदी.

बिबी ता . फलटण येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक चंद्रकांत सुतार यांचे सेवानिवृती बद्दल व विविध स्पधेत यश मिळवलेल विद्यार्थी यांचा बिबी ग्रामस्थ

व शालेय शिक्षण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी पंचायत समिती सदस्य महेंद्रकुमार गांधी बिबी विकास सोसायटीचे अध्यक्ष बळवंतराव नलवडे केंद्र प्रमुख राजेंद्र पवार शिक्षक बँकेच्या संचालिका पुष्पलता बोबडे सरपंच रूपाली बोबडे शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष विशाल बोबडे माजी सरपंच प्रिती काशिद समाजसेविका जयश्री बोबडे आप्पासाहेब मोरे मुस्व्याधिपिका जयश्री बोबडे उपस्थित होते

बोबडे म्हणाले शाळेचा चेहरा मोहरा लोकसहभागातून सुतार गुरुजी यांनी बदलला त्या बरोबर शाळा परिसरात वृक्षारोपण करून त्याला रविवारी सुट्टी दिवशी येवुन पाणी घालून हिरविगार केल्याने बिबी शाळेस सुतार गुरुजी व विशाल बोबडे यांनी गत वैभव मिळवुन दिले आहे.

यावेळी पदवीधर शिक्षक संजय बोबडे नितीन बोबडे रूपाली बोबडे आप्पासाहेब मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास मनोहर बोबडे सुरेश गायकवाड संदीप कचरे अमोल बोबडे जयकुमार भोसले निता बोबडे स्नेहल बोबडे तनुश्री बोबडे शिवाजंली ढवळे विराज बोबडे विघनेश कुंभार यशराज भोसले आदी बिबी ग्रामस्थ पालक विद्यार्थी उपस्थित होते.